निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र


# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६३ वा.
गुरूवार : २७ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंडे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


## भारतीयांसाठी अत्यंत अभिमानाचा, अपूर्व क्षण....

## युनेस्को मुख्यालयात संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुढाकार





**मुंबई**/ महाराष्ट्र शासनाने युनेस्कोच्या मुख्यालयाला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा भेट म्हणून दिला होता. या पुतळ्याचे अनावरण करण्यात आल्याने युनेस्कोच्या पॅरिसमधील मुख्यालय प्रांगणात संविधान दिनीच डॉ. आंबेडकर यांचा पुतळा दिमाखात उभा राहिला.

'हा क्षण तमाम भारतीयांसाठी अभिमानाचा असल्याची प्रतिक्रिया व्यक्त करतानाच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युनेस्कोशी संबंधित सर्व पदाधिकारी, वरिष्ठाधिकारी यांचे आभार मानले आहेत. ते म्हणतात, 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेने आणि प्रतिभेने जगाला समता-बंधुता आणि सामाजिक परिवर्तनाची दिशा दिली. भारताला मिळालेले संविधान हे त्यांच्या उत्तुंग अशा कर्तृत्वाचा अविष्कार आहे. अशा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे संविधान दिनीच अनावरण हे जगातील सर्वांत मोठ्या लोकशाही राष्ट्राला मिळालेल्या संविधानप्रती व्यक्त झालेला परमोच्च आदराचा क्षण आहे. आम्ही हा क्षण महाराष्ट्रातील तमाम जनतेच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती अभिवादनाची संधी मानतो.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हा पुतळा उभा रहावा, यासाठी प्रयत्नशील अशा सर्वांचे अभिनंदनही करतो. यानिमित्ताने सर्व नागरिकांना शुभेच्छा देतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

युनेस्कोच्या मुख्यालयात युनेस्कोचे महासंचालक खालिद अल-इनाय यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण झाले. याप्रसंगी भारताचे युनेस्कोतील स्थायी प्रतिनिधी विशाल शर्मा यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाने यापूर्वीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लंडन येथील घर खरेदी आणि त्याचे संग्रहालयात रूपांतरण केले आहे. जपानमधील कोयासान विद्यापीठातही डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभा राहिला आहे.

आता मुंबईतील इंदूमिल येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकाच्या कामालाही वेग दिला आहे, याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी वेळोवेळी निर्देश दिले आहेत.

## शिष्यवृत्ती परीक्षा आता २२ फेब्रुवारीला

**मुंबई**/महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५ वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८ वी) शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ च्या तारखेत बदल करण्यात आला आहे. आता ही परीक्षा ८ फेब्रुवारी २०२६ ऐवजी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी घेण्यात येणार आहे.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) तर्फे केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा (सीटीईटी) देखील ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे. राज्यातील अनेक प्राथमिक व माध्यमिक शिक्षक सीटीईटी परीक्षेला बसणार असल्याने त्यांच्याकडून शिष्यवृत्ती परीक्षेची तारीख बदलण्याची मागणी करण्यात आली होती.

या पार्श्वभूमीवर परिषदेने शिष्यवृत्ती परीक्षेचा दिवस बदलत नवीन तारीख २२ फेब्रुवारी २०२६ जाहीर केली आहे. सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी, पालकांनी, शाळांनी व परीक्षा केंद्रांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी केले आहे.

## महाराष्ट्र हादरला! १३ वर्षीय अल्पवीयन मुलीवर ५५ वर्षाच्या नराधमाकडून अत्याचार

**मालेगाव**/ मालेगावात पुन्हा एकदा हादरलं आहे. १३ वर्षीय मतिमंद मुलीवर एका ५५ वर्षाच्या संशयित आरोपीकडून अत्याचार करण्यात आल्याची निंदनीय घटना घडल्याने मालेगाव पुन्हा एकदा हादरले आहे. पीडित बालिकेला दिपक धनराज छाजेड रा. मालेगांव जि नाशिक, वय वर्ष अंदाजे ५५, या संशयित आरोपीने फूस लावून अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

संशयीत आरोपीने त्याच्या स्कुटीवर बसवून एका पडीत जागेवर घेऊन जाऊन अत्याचार केले. या प्रकरणी पोलिस ठाण्यात अत्याचार व पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून या संशयित आरोपीला पोलिसांनी अटक करून आज न्यायालयात हजर करण्यात आले. नुकतीच मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावातील ३ वर्षीय बालिकेवर अत्याचार करत तिचा निर्घुण खून करण्यात आल्याची घटना ताजी असताना, जनतेचा रोष अजूनही ताजा असताना अशी घटना पुन्हा घडल्याने यावर शासनाने कठोर पाऊल उचलावे अशी मागणी आता जनतेकडून करण्यात येत आहे. नाशिकमधील मालेगावमध्ये शुक्रवारी चार वर्षांच्या मुलीवरील बलात्कार आणि हत्येप्रकरणी न्यायालयाबाहेर जोरदार निदर्शने करण्यात आली. अटक केलेल्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी निदर्शकांनी केली. शुक्रवारी मालेगावमध्ये बंदचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये हजारो लोक पायी मोर्चात सहभागी झाले होते. अधिकाऱ्यांनी वृत्त दिले की काही निदर्शकांनी न्यायालयाच्या आवारात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला, परंतु पोलिसांनी त्यांना रोखले. शिवाय, राज्यमंत्री नरहरी झिरवाल यांनी सांगितले की आरोपींना गुन्ह्यासाठी सर्वात कठोर शिक्षा दिली जाईल.

### काय आहे संपूर्ण प्रकरण ?

नाशिक जिल्ह्यात एका तीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याचा आरोप आहे. सोमवारी संतप्त कुटुंबीयांनी रस्ता रोखला आणि गुन्हेगाराला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली.

### दगडाने ठेचून बलात्कार आणि हत्या

आरोपीने तीन वर्षांच्या मुलीवर बलात्कार केला आणि नंतर दगडाने ठेचून तिची निर्घृण हत्या केली. या प्रकरणात एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे.



### आरोपीला सोपवण्याची महिलांची मागणी

गुरुवारी त्याआधी आरोपीला मालेगाव न्यायालयात हजर करण्यात आले. या दरम्यान न्यायालयाच्या आवारात वातावरण अत्यंत तणावपूर्ण बनले. या घटनेमुळे संतप्त झालेल्या स्थानिक महिला मोठ्या संख्येने न्यायालयाबाहेर जमल्या आणि त्यांनी आरोपीला त्यांच्या ताब्यात देण्याची मागणी करत जोरदार निदर्शने केली. महिलांच्या या तीव्र निषेधामुळे आवारात गोंधळ निर्माण झाला, त्यानंतर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आरोपीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी पोलिसांना न्यायालयाच्या आत आणि बाहेर मोठा सुरक्षा दल तैनात करावा लागला.

## सरकारकडून आता विद्यार्थीनींसाठी सर्वात मोठी घोषणा, २०२६ आधीच बँक खात्यात येणार २५०० रुपये!

**मुंबई**/ महाराष्ट्रात लाडकी बहीण योजना अतिशय प्रसिद्ध आहे. या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये देण्यात येतात. सरकार विविध घटकांसाठी अशा योजना जाहीर करत असते. दरम्यान राजस्थान सरकारनेदेखील विद्यार्थीनींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी खास योजना आणली आहे. याअंतर्गत विद्यार्थीनींच्या खात्यात दरमहा विशिष्ट रक्कम जमा होणार आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

राजस्थान सरकारने मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी आपकी बेटी योजनासुरु केली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील मुलींना, विशेषतः ज्या कुटुंबात पालकांचे निधन झाले आहे किंवा बीपीएल (गरीबी रेषेखालील) श्रेणीतील असलेल्या मुलींसाठी ही योजना आहे. गरिबीमुळे किंवा आर्थिक अडचणींमुळे शिक्षण सोडणाऱ्या मुलींच्या ड्रॉपआऊट दर कमी करणे हे यामागचे मुख्य उद्दिष्ट आहे.

राजस्थान बालिका शिक्षा फाउंडेशनद्वारे ही योजना राबवली जाते. ज्यामध्ये सरकारी शाळांमधील इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या मुलींना थेट आर्थिक सहायता मिळते. यामुळे कुटुंबावरील आर्थिक भार कमी होईल आणि मुली स्वावलंबी होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

### पात्रता निकष काय ?

या योजनेचा लाभ फक्त राजस्थानच्या सरकारी शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलींनाच मिळेल. यासाठी विद्यार्थीनी राजस्थानची कायमस्वरूपी रहिवासी असावी, बीपीएल कुटुंबातील असावी आणि पालकांपैकी एक किंवा दोघांचेही निधन झाले असावे. इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या मुलींना हा लाभ मिळू शकतो. पुरुष विद्यार्थी किंवा खासगी शाळेतील मुलींना या योजनेचा फायदा घेता येणार नाही. अर्जदाराने जन आधार कार्ड आणि बँक खाते जोडलेले असावे. याशिवाय आधार कार्ड, निवास प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र आणि पालकांच्या मृत्यू प्रमाणपत्र (लागू असल्यास) आवश्यक आहेत. हे निकष पूर्ण न केल्यास अर्ज नाकारला जाऊ शकतो, याची विद्यार्थीनींनी नोंद घ्या.

बँक खात्यात डीबीटी योजनेअंतर्गत आर्थिक सहायता इयत्तेनुसार दिली जाते. इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या मुलींना



दरवर्षी २१०० ची मदत मिळेल, जी पुस्तके, शुल्क आणि इतर शिक्षण खर्चासाठी वापरता येईल. इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या मुलींना २५०० ची रक्कम मिळेल, जी उच्च शिक्षणासाठी अधिक उपयुक्त ठरेल. ही रक्कम थेट लाभार्थ्यांच्या जन आधार लिंक्ड बँक खात्यात डीबीटी (डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर) द्वारे जमा केली जाते. यामुळे पारदर्शकता वाढते. रक्कम वर्षाला एकदा जमा केली जाते आणि ती मुलीच्या नावाने असते. ती रक्कम तिच्याच शिक्षणावरच खर्च व्हावी अशी अपेक्षा असते.

### कशी असेल अर्ज प्रक्रिया ?

अर्ज प्रक्रिया ऑनलाइन असू सरकारी शाळांद्वारे राबवली जाते. विद्यार्थिनी किंवा शाळा व्यवस्थापन बेनिफिशरी स्कीम पोर्टल किंवा राजशाला दर्पण पोर्टलवर (रिक्षीरपीझ्ींीळ.पळल. ळप किंवा शालादर्पण.राज. पळल.ळप) माहिती भरु शकतात. येथे आधार, बँक पासबुक, जात/निवास प्रमाणपत्र आणि मृत्यू प्रमाणपत्र अशी आवश्यक कागदपत्रे अपलोड करा. २०२५ साठी शाळांनी २५ नोव्हेंबरपर्यंत सर्व माहिती ऑनलाइन सादर करावी, अशी अंतिम मुदत आहे. शिक्षण संचालनालय ३० नोव्हेंबरपर्यंत पडताळणी केली जाणार आहे. यात चुकीची माहिती दिल्यास अर्ज रद्द होईल आणि कायदेशीर कारवाई होऊ शकते, याची नोंद घ्या.

### नवीन वर्षापूर्वीच मुलींना मदत

पडताळणीनंतर रक्कम डिसेंबर २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात किंवा जानेवारी २०२६ मध्ये खात्यात जमा होईल. यामुळे नवीन वर्षापूर्वीच मुलींना मदत मिळणार आहे. उमेदवारांनी आपले जन आधार आणि बँक तपशील अपडेट ठेवण्याचे आवाहन करण्यात आलंय. राजस्थान बालिका शिक्षा फाउंडेशन आणि शिक्षण विभागाकडे या योजनेची जबाबदारी देण्यात आली आहे. योजना यशस्वी करण्यासाठी शाळा आणि पालकांचा सहभाग आवश्यक आहे. ही योजना मुलींच्या साक्षरता दर वाढवण्यास आणि लिंग समानतेस मदत करणार आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत वेबसाइट तपासावी किंवा हेल्पलाइनवर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ ला ९३ टक्क्यांहून अधिक उपस्थिती

**मुंबई**/ महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे आयोजित महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महा-टीईटी) २०२५ रविवार २३ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील ३७ जिल्हा मुख्यालयांवर सुरळीतपणे पार पडली. परीक्षेसाठी १,४२३ केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. राज्य तसेच जिल्हा नियंत्रण कक्षाच्या देखरेखीखाली परीक्षा विनाअडथळा सुरळीत झाली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत देण्यात आली. या परीक्षेसाठी प्रविष्ट झालेल्या एकूण परीक्षार्थींची संख्या ४,७५,६६९ होती. यापैकी ४,४६,७३० (९३.९१ टक्के) परीक्षार्थी उपस्थित होते.

परीक्षा पारदर्शक आणि गैरप्रकारमुक्त ठेवण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. यात सीसीटीव्ही, बायोमेट्रिक आणि एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला. त्याचबरोबर उमेदवारांचे फोटो व नावे यांची पडताळणी करण्यात आली. बदललेले फोटो, वेगवेगळी नावे किंवा बोगस उमेदवार ओळखण्याची प्रणाली प्रभावी ठरली.

सर्व परीक्षा केंद्रसंचालक, परीक्षा नियंत्रण कक्ष आणि महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे इंटरनेट फोनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यामुळे दिवसभर परीक्षा केंद्रांना सूचना निर्गमित करण्यात आल्या व त्यांचे काटेकोर पालन झाल्याचे परिषदेने स्पष्ट केले.




राज्याच्या कंट्रोल रूममधून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून नांदेड जिल्ह्यातील एका केंद्रावर दोन विद्यार्थी व बीड जिल्ह्यातील एका केंद्रावर सहा विद्यार्थी चर्चा करून उत्तरे लिहीत असल्याचे निदर्शनास आले होते. त्यामुळे समवेक्षांद्वारे संबंधित आठ विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावरून बाहेर पाठविण्यात आले. तर समवेक्षांकावर रितसर चौकशी प्रस्तावित करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.

# पडद्यावरील ही मॅन काळाच्या पडद्याआड...

१९६० ते १९८० हा काळ हिंदी चित्रपटसृष्टील सुवर्णकाळ समजला जातो. या सुवर्णकाळाने हिंदी चित्रपट सृष्टीला एका पेक्षा एक असे अनेक महान कलाकार दिले. या कलाकारांनी आपल्या अभिनयाने हिंदी चित्रपट सृष्टीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. आता मात्र या सुवर्ण काळाचे साक्षीदार असलेले महान कलाकार एक एक करून आपल्याला सोडून चालले आहेत. असेच एक महान कलाकार ज्यांनी आपल्या अभिनयाने आणि देखणेपणाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले ते हिंदी चित्रपट सृष्टीतील एक महान कलाकार धर्मेंद्र हे ही प्रेक्षकांना कायमचे सोडून गेले. अभिनेते धर्मेंद्र यांनी सोमवारी, २४ नोव्हेंबर रोजी वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवरच नव्हे तर एकूणच मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली. ८ नोव्हेंबर १९३५ रोजी जन्मलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास पाच दशकांहून अधिक काळ आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना मोहित केले. १९६० साली अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या धर्मेंद्र यांनी जवळपास ३०० हून अधिक चित्रपटात भूमिका केल्या . दिल भी तेरा हम भी तेरे हा त्यांचा पहिला चित्रपट. त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला चांगले यश मिळाले. राजबिंडा चेहरा आणि मोहक हास्य आणि पिळदार शरीरयष्टी यामुळे त्यांना अनेक रोमँटिक भूमिका मिळाल्या. कारकिर्दीच्या सुरुवातील एक रोमँटिक हिरो म्हणून त्यांनी मोठा पडदा गाजवला. मीना कुमारी, सायरा बानू, शर्मिला टागोर, आशा पारेख, माला सिन्हा, परवीन बाबी, हेमा मालिनी, रीना रॉय, राखी, जया प्रदा या त्या काळातील सर्व मोठ्या अभिनेत्रींसोबत त्यांनी स्क्रीन शेअर केली. पुढे त्यानी क्शनपटात भूमिका केल्या. १९७६ ते १९८४ या काळात त्यांनी अनेक त्यांनी क्शनपट केले. धर्मेंद्र मोठ्या पडद्यावर गुंडांबरोबर नेहमीच दोन हात करत म्हणून त्यांची गरम - धरम आणि ही मॅन अशी ओळख निर्माण झाली. ही मॅन ही बिरुदावली तर त्यांना कायमची चिकटली म्हणूनच त्यांच्या निधना नंतर पडद्यावरचा ही मॅन काळाच्या पडद्याआड गेला अशी बातमी टीव्ही चॅनलवर झळकली. धर्मेंद्र यांनी त्या काळातील सर्व महान दिग्दर्शकांसोबत काम केले. बिमल रॉय, जे पी दत्ता, मोहन कुमार, राजकुमार कोहली, राज खोसला, रमेश सिप्पी या दिग्दर्शकांनी त्यांना आपल्या चित्रपटात

नेहमीच संधी दिली. अर्जुन हिंगोरानी यांच्या जवळपास सर्व चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. हकिकत, ममता, अनुपमा, आये दीन बहार के, मेरे हमदम मेरे दोस्त, इज्जत, आँखें, सत्यकाम, आया सावन झुमके, जीवनमृत्यू, मेरा गाव मेरा देश, सीता और गीता, यादोंकी बारात, चुपके चुपके, शोले, धरमवीर, ब्लॅकमेल, जुगणू, कलाकार, दिल्लगी, द बर्निंग ट्रेन, राम बलराम, गुलामी, हुकूमत, बटवारा, क्षत्रिय, जॉनी गद्दार हे आणि यासारखे त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट गाजले त्यातील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना खूप भावल्या. त्यांच्या चित्रपटातील गाणीही लोकप्रिय ठरली. त्यांनी अभिनय केलेल्या शोले या चित्रपटाने तर इतिहास घडवला. या चित्रपटात त्यांनी साकारलेल्या वीरू या पात्राने तर जवळपास चार पिढ्यांवर अधिराज्य गाजवले. शोले आणि त्यातील जय वीरू याशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहासच पूर्ण होऊ शकत नाही. शोले चित्रपटाची शूटिंग चालू असतानाच ते हेमा मालिनीच्या प्रेमात पडले आणि पुढे दोघांनी लग्न केले.

अभिनेते धर्मेंद्र यांनी केवळ हिंदीच नव्हे तर पंजाबी चित्रपटातही भूमिका केल्या. त्यांनी एका मराठी चित्रपटातही भूमिका केली. अभिनेते धर्मेंद्र यांनी काही चित्रपटाची निर्मितीही केली. सनी देवल आणि बॉबी देवल या आपल्या मुलांसाठी त्यांनी अनुक्रमे बेताब आणि बरसात या चित्रपटांची निर्मिती केली. अभय देवल या आपल्या भाच्यासाठीही त्यांनी सोचा न था या चित्रपटाची निर्मिती केली. पुढे त्यांनी राजकारणातही प्रवेश केला. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राजस्थान मधील बिकानेर मधून भाजप कडून निवडणूक लढवली आणि जिंकली पण राजकारण हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणातून निवृत्ती स्वीकारीत पुन्हा आपला मोर्चा अभिनयाकडे वळवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. २०१२ साली भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ चित्रपट सृष्टीवर आणि प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा हा महान कलाकार प्रेक्षकांना सोडून गेला. त्यांचे जाणे अकाली नव्हते तरीही त्यांचे जाणे प्रेक्षकांसाठी चटका लावून जाणारे ठरले. अभिनेते धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

# २६/११ च्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांच्या आठवणीत,पैठण एम आय डी सी पोलीस ठाण्याच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित ..

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी प्रतिनिधि/ हारून शेख/** २६ दि. रोजी पैठण एम आय डी सी पोलीस स्टेशन यांच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते, उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्र्वर जगदाळे यांनी सर्व रक्तदात्यांना नाष्टा चहा पाणी ची व्यवस्था केली होती.

*सहाय्यक पोलीस निरीक्षक ईश्र्वर जगदाळे यांनी असे सांगितले की रक्तदान करने याचा अर्थ असा आहे की त्यांनी स्वत: च्या रक्तातील काही भाग (साधारणपणे ४५०मिली) इतरांना देणगी म्हणुन दिला आहे, ज्यामुळे त्यांचे प्राण वाचू शकतात किंवा त्याना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळू शकते. हे एक उदात्त कार्य मानले जाते, ज्यामुळे गरजुंना मदत होते. त्यामुळे शहीद झालेल्या जवानांच्या आठवणीत रक्तदान शिबीर आयोजित केले होते.






मार्गदर्शक डॉ. विनयकुमार राठोड पोलीस अधिक्षक छत्रपति संभाजी नगर अन्नपूर्णा सिंह अप्पर पोलीस अधिक्षक छत्रपति संभाजीनगर सुनिल पाटील उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग पैठण सहायक पोलीस निरीक्षक ईश्र्वर जगदाळे पैठण एम आय डी सी, सहायक पोलीस निरीक्षक ईश्वर जगदाळे यांच्या सामाजिक कार्याच्या विचार सरणीचे सर्व उपस्थितांनी भरभरून कौतुक केले.

यावेळी त्या ठीकानी सर्व पोलीस कर्मचारी व,पोलीस पाटील, पत्रकार, डॉ. नागरीक सामाजिक कार्यकर्ता सरपंच उपसरपंच सर्व क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते .

# धर्मेंद्रने नव्या पिढीला दणकट बांधेसूद शरीरयष्टीचे महत्त्व पटवून दिले...

१९६०च्या दशकात दोन तरुण उमदे, ताजेतवाने कलाकार एकदमरूपेरी पडद्यावर झळकले. चित्रपट होता 'शादी'. साधा कौटुंबिक चित्रपट. पुढे 'भारत' बनून नायक निर्माता अन् दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय ठरलेला मनोजकुमार अन् नंतर तगडा हिरो म्हणून गाजलेला धर्मेंद्र हे दोघे त्यावेळी अगदीच नवशिके होते. 'पंजाब दा पुत्तर' आणि 'गरम धरम' म्हणून फिल्मी मॅगझिन्सनी ज्याचा खूप उदोउदो केला तो धर्मेंद्र,आधी अगदीच साधा, लाजरा बुजरा अन् शांत होता.'अंडर प्ले' करण्याकडे त्याचा कल होता. १९६२ मध्ये आलेल्या 'अनपढ' या मोहन सैगल दिग्दर्शित चित्रपटात माला सिन्हाला जबरदस्त भूमिका मिळाली. ती अशिक्षित आणि तिचा नवरा धर्मेंद्र चक्क प्रोफेसर. सुटाबुटातला हा प्राध्यापक त्याने समरसून रंगवला. त्याची भूमिका चित्रपटाच्या आधीच संपते. पण तरी तो लक्षात राहून गेला. 'आप की नजरों ने समझा' या गाण्याच्या वेळी धर्मेंद्र-माला सिन्हा ही जोडी पडद्यावर झकास दिसली. 'अनपढ' दणकून चालला आणि त्याचा फायदा दोघांनाही मिळाला. 'आप की परछाईयाँ' आणि 'देवर' या चित्रपटांमधून धर्मेंद्र आणखी परिपक्व होत गेला. मदनमोहन (अनपढ, आप की परछाईयाँ) आणि रोशन (देवर) यांची गाणी तेव्हा खूप श्रवणीय ठरली.

धर्मेंद्र प्रेक्षकांच्या खरा लक्षात आला तो 'फूल और पत्थर' या भव्य रंगीत चित्रपटामुळे. इथे मीनाकुमारी त्याची नायिका होती. ती विधवा आणि असहाय्य तर हा गुन्हेगारी जगतात बुडालेला शराबी. तिची शांत सोज्वळ प्रतिमा तर हा आक्रमक दणकट व्यक्तिमत्वाचा पत्थरदिल इन्सान, पण शांती (मीनाकुमारी) आपल्या व्यक्तिमत्वाने शाकाचा (धर्मेंद्र) कायापालट घडवते. दोन्ही व्यक्तिमत्त्वांमधला विरोधाभास मोठा मनोज्ञ ठरला. पांढऱ्याशुभ्र साडीमध्ये मीनाकुमारी अन् पिळदार शरीराचं दर्शन घडवणारा 'ही मॅन' धर्मेंद्र ही जोडी प्रेक्षकांना रोमांचित करून गेली. रवीचे संगीत कर्णमधूर होते. रंगांची उधळण, श्रीमंत निर्मिती हे 'फूल और पत्थर'चे मोठे आकर्षण ठरले. मीनाकुमारीला आगीतून वाचवताना धर्मेंद्रचा चेहरासुद्धा खूप होरपळून निघाला. 'अगली फिल्म में आग का सीन जरूर डालना' ही उपरोधित प्रतिक्रिया देत मीनाकुमारी आणि धर्मेंद्र यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. दोघांनी 'पूर्णिमा', 'चंदन का पलना' अशा चित्रपटांमध्ये एकत्र काम केले. रामानंद सागर यांच्या 'आँखे' या चित्रपटात धर्मेंद्र गुप्तहेर म्हणून चमकला. माला सिन्हाबरोबर त्याची जोडी जमली. त्याचा पडद्यावरचा वावर आता अधिक जोशिला अन् आत्मविश्वासपूर्ण वाटू लागला. इथे पुन्हा एकदा रवीचे संगीत वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

बी. आर. फिल्म्सच्या यश चोप्रा दिग्दर्शित 'आदमी और इन्सान'मध्ये धर्मेंद्रचा डॅशिंग रोल होता. सायरा बानू अन् मुमताज अशा दोन नायिका इथे धरमबरोबर दिसल्या. 'चैताली' हा बिमल रॉय यांचा अपुरा चित्रपट हृषिकेश मुखर्जींनी पुरा केला. त्यातले धर्मेंद्रचे योगदान मोठे होते. सायरा बानू इथे निराळ्या 'ऑफ बिट रोल'मध्ये चमकली.

हृषिकेश मुखर्जींसमवेत धर्मेंद्रचे सूर छान जुळले. त्यांच्या 'सत्यकाम', 'चुपके चुपके', 'गुड्डी' अशा अनेक चित्रपटांमधून धर्मेंद्र विभिन्न भूमिकांमध्ये दिसला. 'सत्यकाम'मध्ये धर्मेंद्र ध्येयवेडा, नि:स्पृह अभियंता म्हणून वावरला. शर्मिला टागोर, संजीवकुमार







असे जबरदस्त कलावंत समोर असताना धर्मेंद्र ही भूमिका खरोखर जगला. 'सत्यकाम'ला पुरेसे यश न मिळाल्यामुळे धर्मेंद्र आणि हृषिदा खूप निराश झाले असणार. 'गुड्डी'मध्ये तर धर्मेंद्र सिनेनट धर्मेंद्र म्हणूनच दिसला आणि त्याने बहार उडवून दिली. जया भादुरीनंतर 'गुड्डी'मध्ये तोच लक्षात राहून गेला.

'चुपके चुपके'मध्ये त्याने अचूक टायमिंग साधत शर्मिला अन् अमिताभ बच्चन यांच्यापेक्षा प्रभाव पाडत विनोदी अभिनयातले स्वत:चे कर्तृत्व सिद्ध केले. नूतन (सूरत और सीरत), आशा पारेख (समाधी), मुमताज (लोफर, झील के उस पार) अशा अनेक नायिकांबरोबर त्याने काम केले तरी त्याची सरस जोडी जमली ती हेमा मालिनीबरोबर.

'मैं कहीं कवि न बन जाऊँ'(प्यार ही प्यार), 'ये शमा तो जली' (आये दिन बहार के), 'आज मौसम है बेईमान'(लोफर) या महंमद रफीच्या सुरेल गीतांना त्याने रूपेरी पडद्यावर यथोचित न्याय दिलाय यात शंकाच नाही.

'तुम हँसी मैं जवा', 'शरारत', 'नया जमाना', 'आझाद', 'जुगनू', 'आसपास', 'राजा जानी', 'चरस' अशा अनेक चित्रपटांमध्ये धर्मेंद्र-हेमा मालिनी जोडीने चाहत्यांना खूश करून टाकले. 'मुन्ने की अम्मा रे'(तुम हँसी मैं जवाँ) या गाण्यात धर्मेंद्रने लोटपोट हसवले. 'राजा जानी' आणि 'जूगनू' मधला हेमा-धर्मेंद्रचा रोमान्स खूप रोमांचक ठरला. राज कपूर-नरगिस जोडीनंतर प्रेक्षकांना खिळवून ठेवणारी 'हिट पेअर' म्हणून धर्मेंद्र-हेमा मालिनी यांचा प्रचंड बोलबाला झाला. हेमा मालिनी 'आझाद'मध्ये त्याचे 'लंबा कद चौडा सीना' असे वर्णन करते तेव्हा तिच्या चेहऱ्यावरचे भावदर्शन मोठे विलोभनीय होते. रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले' या चित्रपटात या जोडीने धुमाकूळ घातला. 'कोई हसीना जब' या गाण्यातला रूसवा-फुगवा लाजवाब ठरला. पाण्याच्या टाकीवर चढून धरमने दारूच्या नशेत म्हटलेले धमाल संवाद 'शोले'चे मोठे आकर्षण ठरले.

'सीता और गीता' मधला धर्मेंद्रचा डोंबारी अफलातून होता. 'अनाडी है कोई खिलाडी है कोई' या मन्ना डेच्या गाण्यात धर्मेंद्रने बहार उडवून दिली. राजू (आझाद) हे रफीचे गीत घोड्यावर बसून गाताना धरमने छोट्या मुलांना आकर्षित करून घेतले. 'धरम-वीर'मध्ये त्याने प्राणला तोडीस तोड झुंज दिली. 'कहानी किस्मत की' या अर्जुन हिंगोरानी यांच्या चित्रपटात 'रफ्ता रफ्ता देखो' या किशोरने गायलेल्या गाण्यात रेखासमवेत 'अग ये, जवळ ये लाजू नको' म्हणत मराठमोळ्या अवतारात धर्मेंद्रने प्रचंड धमाल उडवून दिली. उत्स्फूर्त, अनावर भावनांचा हा अनोखा हंगामा, प्रेक्षकांमध्ये मोठा जल्लोष निर्माण करत लोकप्रियतेची बुलंदी गाठून गेला. दिल्लगी (हेमा मालिनी), दोस्त (हेमा, शत्रुघ्न), मेरा गाव मेरा देश (आशा पारेख, विनोद खन्ना), रखवाला, बाजी (रेखा) हे धर्मेंद्रचे आणखी काही गाजलेले चित्रपट. धर्मेंद्रच्या अभिनयात उपरोध, आर्त उदासी, प्रणयातूर प्रेमी या साऱ्या भावभावना दिसत. 'माँऽऽ' ही त्याची ओथंबलेली हाक आणि 'एक एक को चुन चुनके मारूँगा' हा उद्रेक प्रेक्षकांच्या अंतर्मनाला स्पर्श करून जाई.

हेमा मालिनीबरोबर त्याचे दुसरे लग्न देशभर खळबळ माजवून गेले. पण त्या दोघांच्या चाहत्यांना विलक्षण आनंद झाला एवढे नक्की.

धर्मेंद्रने नव्या पिढीला दणकट बांधेसूद शरीरयष्टीचे महत्त्व पटवून दिले. आज आमिर खान, सलमान खान, हृतिक रोशन त्याचे अनुकरण करताहेत. 'प्रतिज्ञा' हा धर्मेंद्रचा सर्वांगसुंदर चित्रपट. 'मैं जट यमला पगला दिवाना' या गाण्यातला त्याचा हंगामा विसरणे शक्य नाही. सनी आणि बॉबी ही मुले आज चित्रपट गाजवत आहेत. आता तो आपल्यामध्ये नसला तरी नानाविध भूमिकांमधून ठेवलेला आठवणींचा नजराणा चित्रपटरसिक कधीच विसरणार नाहीत.

या व्यक्तिरेखांमध्ये धर्मेंद्रने उडवून दिलेली धमाल आणि दाखवून दिलेले अनेक प्रकारचे भाव चाहते हयातभर लक्षात ठेवतील.

# सगरोळी व सगरोळी परिसरातील विज ग्राहकाना जास्तीचे आलेले बिले आठ दिवसात कमी करुन देण्याच्या अश्वासन नंतर आदोलन माघार

**आत्ताच एक्सप्रेस**
**देगलूर प्रतिनिधी/** बिलोली तालुक्यातील सगरोळी व सगरोळी परिसरात जबरदस्तीने विद्युत विभाग स्मार्ट मिटर बसवले आहे सदरील स्मार्ट मिटर सुरुवातीच्या दोन महीने कमी रिडीग पळत आहे दोन महीन्याच नंतर तेच मिटरचे रिडींग डबल होत आहे या मुळे विद्युत ग्राहकांच्या मनात स्मार्ट मिटर संबधात संशय आहे आनेक ग्राहकांना पच्चावन हजार,एकत्तीस हजार,आठ्ठावीस हजार बिले देण्यात आले. दोन फॅन दोन ब्लफ असलेल्या ग्राहकाला एवढे मोठी रक्कम असलेले बिले येत आहेत या मुळे आनेक विज ग्राहाक विद्युत विभागाच्या अधिकारी समोर रोष वैक्त केले आहे. विज ग्राहकांचे मिटर तापसानी करुन जास्तीचे येत असलेले विज बिल आठ दिवसात



कमी करुन देण्याच्या अश्वासना नंतर सगरोळी परिवर्तन समीतीच्या वतीने चालु असलेले अंदोल स्थगीत करण्यात आले आहे या वेळी विश्वनाथ समन,शंकर महाजन,शिवकुमार बाबणे,प्रभु मुत्तेपोड,बाबु उस्केलवार,सुनिल खिरप्पावार,राजु बामने, शेख मुर्तुज,सचिन कल्लोड,आदिनाथ बाबणे,बाबु पिंजारी,बसस्वेश्वर मुगळे,पांडुरग इबीतवार,विजय शिंदे,वैभव भोसले, संजय पद्दमवार,कोडलांडे नागोराव सह शेकडो नागरीक उपस्थीत होते.यानंतर विज ग्राहकास विद्युत विभागाकडुन आर्थिक पिळवनुक न थाबवल्यास पुढील काळत या पेक्षाही तिव्र जनअंदोलन करण्याचा ईशारा सगरोळी परिवर्तन समीतीकडुन देण्यात आले आहे.

# अपघातग्रस्त सुदे कुटुंबीयांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी च्या वतीने दहा लक्ष रूपयांची मदत - ड.राजेश्वर चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस**
**धारूर /प्रतिनीधी/**
धारूर तालुक्यातील धुनकवाड पाटी जवळ चार दिवसापुर्वी बीड अग्नीशमन दलाच्या गाडीने अपघातग्रस्त झालेल्या सुदे कुटुंबातील सौ.कुसुमताई विष्णू सुदे यांचे उपचारादरम्यान लातूर येथे दु:खद निधन झाले असून विष्णू दामोदर सुदे यांची प्रकृती गंभीर आहे.त्यांच्यावर पुणे येथील रुबी हॉल हॉस्पिटल मध्ये उच्च प्रतिचे उपचार चालु आहेत.या कुटुंबाच्या उपचाराचा सर्व खर्च शासनाच्या वतीने करण्यात येत आहे.या बाबत चे आदेश उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी बीड जिल्हाधिकारी यांना दिले आहेत.

या घटनेबद्दल भ्रमणध्वनीवरून बोलताना ना.अजितदादा पवार म्हणाले की,घटना खूप दुर्दैवी व मनाला वेदना देणारी आहे.या घटनेत विष्णू सुदे यांच्यावर उच्च प्रतिचे उपचार चालू असून त्यांची प्रकृती लवकर चांगली व्हावी यासाठी ईश्वरला प्रार्थना करतो.परंतू या घटनेत आमची लाडकी भगिनी सौ.कुसुमताई विष्णू सुदे यांचे उपचारादरम्यान दु:खद निधन झाले आहे.यामुळे मला व्यक्तिश: खूप दु:ख झालेले आहे.या घटनेमुळे सुदे परिवारासोबत दु:खात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सोबत आहे.

झालेली घटना खूप दु:खद आहे.गेलेली आमची लाडकी भगिनी परत येणार नाही परंतू शिव,शाहू ,फुले,आंबेडकर,स्व.यशवंतराव चव्हाण साहेब यांच्या विचाराने चालणारा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष कोणालाही उघड्यावर पडू देणार नाही.करीता राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने दोन्ही मुलींचे शिक्षण व भविष्यासाठी या कुठुंबाला दहा लक्ष रूपयाची सानुग्रह मदत देत आसून दोन मुलींच्या नावे पाच पाच लक्ष रुपये स्टेट बँक ऑफ इंडीया,शाखा धारूर येथे त्यांच्या वयाच्या आठरा वर्षाच्या मुदतीपर्यंत फिक्स डिपॉझिट राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष,बीड च्या वतीने करणे बाबत आदेशीत केले आहे. तात्काळ मुलींचे बँक खाते काढून पाच,पाच लक्ष रूपये दोन्ही मुलींच्या नावे फिक्स डिपॉझिट करणार असल्याची माहीती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ड.राजेश्वर चव्हाण यांनी माध्यमांना प्रसिद्धि पत्रकाद्वारे दिली आहे.

# त्रिभाषा धोरण निश्चिती समितीची विभागीय संवाद भेट

# जास्तीत जास्त लोकांनी आपले मत नोंदवावे- डॉ.नरेंद्र जाधव




**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीची आज छत्रपती संभाजीनगर येथे एमआयटी महाविद्यालयात आनंद सभागृहात विभागीय संवाद बैठक पार पडली. शिक्षण, भाषा, बालकांचे मानसशास्त्र, संस्थाचालक, पालक, पत्रकार इ, क्षेत्रातील ३५० हून अधिक लोक यावेळी उपस्थित होते.

समाजातील विविधस्तरातील घटकांनी समिती समोर आपली मते नोंदवावी. त्यासाठी वेबसाईटवर मते नोंदविण्याचा पर्याय आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आव-ाहन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी यावेळी बोलतांना केले.

समितीचे सदस्य डॉ. अपर्णा मॉरीस, डॉ. मधुश्री सावजी, संजय डोरलेकर यावेळी उपस्थित होते. बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अंकीत, शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी (प्राथ) जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी (माध्य) आश्विनी लाठकर, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, सतीश सातव, डॉ. मुनीश शर्मा,भारत पालवे, प्रियाराणी पाटील आदी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी संविधान दिनानिमित्त संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन झाले. त्यानंतर समितीच्या कामकाजास सुरुवात झाली.

उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. नरेंद्र जाधव म्हणाले, नोंदविलेले सर्व अभिप्राय, मते एकत्रित करून समिती शासनाकडे अहवाल सादर करणार आहे. विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने व्यक्त होता यावे, सादरीकरण आणि संभाषण करता यावे यासाठी त्यांना योग्य भाषाज्ञान दिले पाहिजे. शिक्षकांनी या माध्यमातूनच त्या भाषा शिकविल्या पाहिजेत. यानिमित्त भाषा शिक्षणाबाबत लोकांचे म्हणणे ऐकून सर्व माहितीचे पृथ्थकरण करुन समिती लवकरच आपला अहवाल शासनाला देईल,असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

**संकेतस्थळावरही आपले मत नोंदविता येईल**

कोणती भाषा कोणत्या वर्गापासून सुरू करावी याबाबतचे अभिप्राय, मत नोंदवण्याचे काम नागरिकांनी ු. ींळलहरीहरीराळींळ.ोस.ळप या संकेतस्थळावर प्रश्नावली, मतावली भरून करावे, असे आवाहनही डॉ. जाधव यांनी यावेळी केले.

विविध मान्यवरांचे म्हणणे सादर समितीबरोबर जिल्ह्यातील सामान्य नागरिक, भाषातज्ज्ञ, विचारवंत, मराठी भाषेशी संबंधित शासकीय तसेच अशासकीय, खासगी संस्था त्यांचे अध्यक्ष, सदस्य, लोकप्रतिनिधी, शिक्षक, पालक, पत्रकार इत्यादींनी संवाद साधला. त्यात प्रामुख्याने श्रीकांत उमरीकर, डॉ. रामचंद्र काळुंखे, प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, मिर्झा अब्दुल कय्युम , डॉ. दत्तात्र्य डुंबरे,सुमित खांबेकर, डॉ. गणेश मोहिते. डॉ. मनोज ठाकूर तसेच अनेक मान्यवरांचा सहभाग होता. याशिवाय बाहेरील जिल्ह्यातील लोकांशी समितीने दुरदृष्य प्रणालीद्वारेही संवाद साधला.

मराठी भाषा पाहिलीपासून असावी, तसेच इंग्रजी भाषा पण असावी, हिंदी भाषा कोणत्या वर्गापासून असावी,

संगणकीय भाषेचा समावेश कधी करावा, भाषा किती आणि कोणत्या वर्षापासून शिकवण्यात याव्यात तसेच अन्य भाषांचा अंतर्भाव केव्हा करावा याबाबत उपस्थितांनी आपल्या सुचना मांडल्या. समितीने या सर्व सुचनांची नोंद घेतली.

## जांभळा जिल्हा परिषद शाळा येथे संविधान दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर/ प्रतिनिधी/ सुभान शहा**/ दि २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन गंगापूर तालुक्यातील जांभळा जिल्हा परिषद शाळा येथे उत्साहात साजरा करण्यात आला. विविध धर्म, संप्रदाय, भाषा, चालिरीती असतानाही, सर्वांमध्ये एकात्मता उत्पन्न करणारे असे देशाचे संविधान आहे. या संविधानाने आपल्या देशात अद्वितीयरितीने लोकशाही शासन दृढमूल केले आहे, म्हणून त्याचे आपल्या जीवनात महत्व आहे.




भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उत्तुंग प्रतिभेची ते साक्ष आहे, असे प्रतिपादन मुख्याध्यापक भाकरे सर, यांनी संविधान दिनी जिल्हा परिषद शाळा जांभळा येथे आयोजित कार्यक्रमात केले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून सुरु झालेल्या या समारंभात सुरवातीला सर्व उपस्थित शिक्षक शिक्षिका यांनी संविधानाची उद्देशिका सामुदायिक म्हटली. यावेळी योगेश दाणे जिल्हा संघटक पश्चिम, व सोपान काळे, तसेच शिक्षक शिक्षिका वर्ग व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## जेवणाच्या ताटात पाल; समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील किळसवाणा प्रकार, २८ विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ छत्रपती संभाजी नगरमध्ये समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहात विद्यार्थ्यांच्या जेवणात मृत पाल आढळून आली आहे. एक नंबरच्या मेसमध्ये गवारच्या भाजीमध्ये विद्यार्थ्यांच्या ताटात ही मृत पाल आढळली. यामुळे ज्यांनी जेवण केले होते त्यांना उलट्या आणि मळमळीचा त्रास सुरू झाला. त्यानंतर २८ विद्यार्थ्यांना घाटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.

या घटनेनंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन करत सहायक आयुक्त यांना वसतिगृहात बोलावले. या वेळी सहायक आयुक्त यांनी ठेकेदारांवर कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी आंदोलन मागे घेतले. यापूर्वीही मेसमध्ये सडकी फळं दिल्याच्या, पोह्यामध्ये झुरळ, अळ्या आढळून आल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या होत्या मात्र त्याची दखल घेतली जात नसल्याचा आरोप या विद्यार्थ्यांनी केलाय.

यापूर्वी देखील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर मध्ये मागासवर्गीय मुलींच्या वसतिगृहात देण्यात येणाऱ्या जेवणात किडे निघाल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या या मुलींनी जेवण न करता तहसील कार्यालय गाठून तहसीलदाराकडे तक्रार दिली. ग्रामीण भागातील मागासवर्गीय मुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी याकरिता शासनाने वस्तीगृह सुरू केले मात्र याच वस्तीगृहामध्ये देण्यात येणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या जेवणात किडे निघत आहे, तर, या मुलींना सडके फळ देण्यात येत असल्याने त्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. वारंवार तक्रार करूनही या प्रकरणाची कोणी गांभीर्याने दखल घेत नसल्याने विषबाधा ही होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मुली आणि पालक संतप्त झाले आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकरणी आता समाज कल्याण विभाग काय कारवाई करणार असा सवाल उपस्थित होतोय.




कोल्हापूर शहरातील राजेंद्र नगर इथल्या हॉटेल मनोरा मधील जेवणात पाल आढळून आली होती.

विवेकानंद कॉलेज मधील काही विद्यार्थी हॉटेल मनोरा मध्ये जेवायला गेले होते, त्यावेळी त्याच्या जेवनात मेलेली पाल आढळून आली. त्यांनतर या विद्यार्थ्यांनी ही बाब हॉटेलच्या प्रशासनाच्या दाखवली. या विद्यार्थ्यांनी सर्व ग्राहकाच्या समोर जेवणात पाल दाखविल्यामूळ हॉटेलच्या बाऊंसरांनी या विद्यार्थ्यांना बेदम मारहाण केली.या प्रकरणी रात्री उशिरा पर्यत राजारामपुरी पोलिसांत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.

## लोकशाही दिन सोमवारी (दि.१)

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन आयोजित केला जातो. डिसेंबर महिन्यासाठी लोकशाही दिन हा सोमवार दि.१ रोजी दुपारी १२ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे,असे उपजिल्हाधिकारीओ (सामान्य प्रशासन) श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे. नागरिकांनी आपले अर्ज, निवेदने सकाळी ११ ते १२ या वेळात दाखल करावे. अर्ज विहित नमुन्यात असावा. तक्रार वैयक्तिक असावी. तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केला असल्यास त्याची पोहोच सोबत आणावी. तसेच न्याय प्रविष्ठ प्रकरण, राजस्व अपिल, सेवाविषयक व आस्थापनाविषयक व लोकशाही दिनात यापूर्वी दाखल केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

## ऊसस्थळात बिबट्यांची पिल्ले नजरेस पडल्यास कृपया त्यांना स्पर्स करु नका - वनाधिकारी श्री.टोम्पे

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नडप्रतिनिधी/ उदय कुलकर्णी** /सद्या ऊसतोडीची कापणी सर्वत्र चालू असुन त्या तोडणी दरम्यान बिबट्याचे वास्तव्य असलेल्या परिसरात बिबट्याची मादी उसाचा आश्रय घेऊन त्यात आपल्या पिल्लाना जल्म देत असते. त्यामुळे ज्या परिसरात बिबट्याचे दर्शन या अगोदर झालेले असेल आशा परिसरात ऊसतोडणीचे काम चालू असेल व त्या तोडणी दरम्यान जर बिबट्याची पिल्ले आढळून आली तर त्यांना कृपया स्पर्स न करिता तात्काळ वनविभागाशी संपर्क साधून टो.फ्री.क्र.१९२६ वर माहीती द्यावी असे आव्हाण कन्नड वनपरिक्षेत्र अधिकारी श्री.शिवाजी टोम्पे यांनी तालूका भरातील बळीराजास केले आहे.

तालुक्यातील निमडोंगरी येथील प्राथमिक शाळेत आयोजीत केलेल्या वन्य जीव व त्याबाबत जनजागृती या आयोजीत कार्यक्रमा दरम्यान अध्यक्षीय भाषणात बोलतांना ते पुढे असेही म्हणाले की,ज्या ज्या परिसरात गेल्या अनेक वेळा नागरिकांना बिबट्याचे दर्शन झालेलेअसेल आशा परिसरातील बळीराजाने आपल्या कडील पाळीव प्राण्यांसाठी दिवसा किंवा रात्रीचे वेळी बंदिस्त गोठा किंवा जाळीने तयार केलेल्या गोठ्यातच आपआपली पाळीव प्राणी ठेवावे जेणे करून त्यांच्या जीवितास धोका पोहोचणार नाही.तसेच रात्रीचे वेळी शेतात जातांना मोठी ब्याटरी व मोबाईलचा मोठा आवाज चालू करून गळ्या भवती मोठा रुमाल घट्ट बांधून हातात काठी घेऊन जावे.तसेच पाळीव प्राण्यांच्या बंदिस्त गोठ्यात प्रखर ज्यास्त पावरचा बल्प लावावा त्याजवळ कचऱ्याचे व घाणीचे ढीग साचु देऊ नका,योग्य वेळीच त्याचे व्यवस्थापन करा.जेणे करून कुत्रे,डुकरे ही त्याची असणारी भक्षके त्या ठिकाणी जाणार नाही.व त्यामुळे बिबटेही सदर ठिकाणी जाणार नाही.व धोकाही कमी होईल.या आयोजीत कार्यक्रमात श्री.टोम्पे यांनी विद्यालयातील विद्यार्थी उपस्थित पालक वर्गास बिबट्यापासून




संरक्षण,वन- वणवा प्रतिबंध,व वनसंवर्धन यावर सखोल असे मार्गदर्शन करून सर्वांच्या मनातील वन्य जीवाणबाबताची भीती दूर केली.सदरचा बहुमूल्यअसा हा मार्गदर्शन कार्यक्रम मौजे चिकलठाणचे वनपाल श्री आण्णा वाघ यांनी आयोजीत केला होता.

यावेळी चिकलठाण,वडाळी हिवरखेडा,हिवरखेडा गौताळा, साळेगाव, जैतखेडा, येथील वन सेवक मोठ्या संख्येने हजर होते.विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए.खैरनार,शाळेचे शिक्षकव्रन्द,गावचे सरपंच वाल्मिक गावंडे, आप्पाराव गुळवे, कल्याण गुळवे,सचिन बोराडे, काकासाहेब गुळवे,बळीराम गावंडे,अमोल रणमळे, कृष्ण गुळवे, डी.के.कोल्हे, सौ.बी.एस. सोनवणे, वनपरिमंडळ अधिकारी आण्णा वाघ, वनरक्षक सोमनाथ वाघ, रवींद्र गायकवाड,हरी वाघ,राम जाधव,गोविंद ननावरे,ई.मोठ्या प्रमाणात पालक,विद्यार्थी व वन विभाग व शाळेचे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सैन्यदल भरतीपूर्व प्रशिक्षण

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना भरती पूर्व तयारी करण्यासाठी छात्र पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे दि. १५ ते २४ डिसेंबर या कालावधीत डडइ कोर्स क्र. ६४ आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची नि:शुल्क सोय करण्यात येते.

जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दि.१० डिसेंबर रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी Department of Sainik Welfare, Pune (DSW) यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील SSB - ६४ कोर्ससाठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाने प्रिंट दिलेल्या) प्रवेश पत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट काढून व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावे. प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावे.

केंद्रामध्ये एस.एस.बी. कोर्स मध्ये प्रवेश मिळण्यासाठी नमूद कोणतीही एक पात्रता आवश्यक आहे व त्यासंबधीचे पात्रता प्रमाणपत्र कोर्सला येतांना सोबत घेऊन यावेत.

कंम्बाईड डिफेन्स सर्व्हिसेस एक्झामिनेशन (CBSE-UPSC) अथवा नॅशनल डिफेन्स केडमी एक्झामिनेशन (छऊ--णझ-डउ) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. एनसीसी 'उ' सर्टिफिकेट '-' किंवा 'इ' ग्रेडमध्ये पास झालेले असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्वार्टरने एस एस बी साठी शिफारस केलेली असावी. टेक्नीकल ग्रॅज्युएट कोर्ससाठी एस.एस.बी.मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापीठ प्रवेश प्रणाली (University Entry Scheme) साठी एस एस बी कॉल लेटर असावे किंवा एस एस बी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी-अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक यांचा ई मेल आय डी training.pctcnashikg-mail.com व दूरध्वनी क्र. आणि ०२५३-२४५१०३२ व व्हाटसएप क्र. ९१५६०७३३०६ असून कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवर संपर्क करावा असे आवाहन, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

## शेलगाव येथील वच्छलाबाई मनगटे यांचे निधन

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/ सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील शेलगाव येथील वत्सलाबाई तेजराव मनगटे वयाच्या ६५ व्या वर्षी दिनांक २५ रोजी सायंकाळी ९.३० वाजता संभाजीनगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २६/११/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता शेलगाव येथे अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पछात पती, मुली, सुना नातवंडे असा परिवार असून त्या संजय व राजू मनगटे यांच्या मातोश्री होत्या.



## विभागीय ग्रंथालयात संविधान दिनानिमित्त व्याख्यान

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ संविधान दिनानिमित्त सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालय व शासकीय विभागीय ग्रंथालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील समर्थनगर येथील शासकीय विभागीय ग्रंथालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ड. बाबाराव सरदार यांनी मार्गदर्शन केले. छत्रपती संभाजीनगर विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक व कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील हुसे यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून देवगिरी कन्या विद्यालयाच्या श्रीमती संगीता जाधव उपस्थित होत्या.

याप्रसंगी संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव यांनी तर सूत्रसंचालन अनिल बाविस्कर



यांनी केले. आभार प्रदर्शन ग्रंथालय निरीक्षक आवजी गलांडे यांनी मानले. शासकीय विभागीय ग्रंथालयाचे सभासद, वाचक,देवगिरी हायस्कूलचे विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### जाफ्राबाद तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांना आवाहन

आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/ सामाजिक विशेष अर्थसहाय्य योजनेंतर्गत जाफ्राबाद तालुक्यात एकुण २० हजार ६७२ लाभार्थी आहेत. त्यापैकी दिव्यांग लाभार्थी १ हजार ३०३ असून युडीआयडी व आधार संलग्नीकरण ४०३ लाभार्थ्यांचे यशस्वीरित्या पुर्ण झाले आहे. जे अत्यंत कमी आहे. त्यामुळे जाफ्राबाद तालुक्यातील दिव्यांग लाभार्थ्यांनी आपले युडीआयडी क्रमांक असलेले दिव्यांग प्रमाणपत्र आणि ई-आधारकार्ड तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात स्वत: जमा करावेत, जर लाभार्थ्यांनी कागदपत्रे जमा केली नाही तर त्यांचा लाभ कायमचा बंद करण्याची कार्यवाही करण्यात येईल. असे आवाहन जाफ्राबाद तहसीलदार डॉ.सारिका भगत व नायब तहसीलदार मंगेश साबळे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जात प्रमाणपत्र पडताळणी कडून विशेष मोहिमेचे आयोजन

आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/ भारतीय संविधानाला ७५ वर्ष पुर्ण झाल्यानिमित्ताने संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान या कार्यक्रमाचे औचित्य साधुन जालना जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती मार्फत दि. २६ नोव्हेंबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत समिती कार्यालयात विशेष मोहिम शिबिर राबविण्यात येत आहे. समिती कार्यालयात दररोज कार्यालयीन वेळेत अधिकारी व कर्मचारी तसेच अर्जदार, पालक यांच्या उपस्थितीत त्यांना संविधानाचे वाचन,भारतीय संविधानाचे महत्व याबाबत माहिती देण्यात येणार आहे. तसेच समितीने वैध करण्यात आलेल्या प्रकरणात अर्जदार यांना ऑनलाईन प्रक्रियेव्दारे जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येणार आहे.असे जिल्हा जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या उपायुक्त तथा सदस्य संगीता मकरंद यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ मंगळवारी साप्ताहिक बाजार राहणार बंद

आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/ राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि. ४ नोव्हेंबर, २०२५ रोजी कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. कार्यक्रमानूसार अंबड, भोकरदन व परतूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ साठी दि.२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. तरी नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता अंबड, भोकरदन व परतूर या शहरातील साप्ताहिक बाजार मंगळवार दि.२ डिसेंबर २०२५ रोजी संपुर्णत: बंद ठेवावेत तसेच खाजगी आस्थापनामधील कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी देण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# समाज कल्याण विभागाकडून संविधान दिन उत्साहात साजरा





आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने संविधान अमृत महोत्सव घर घर संविधान या कार्यक्रमांतर्गत बुधवार दि. २६ नोव्हेबर २०२५ रोजी संविधान दिन सहायक आयुक्त,समाजकल्याण जालना या कार्यालयात साजरा करण्यात आला आहे. मुख्य कार्यक्रमापुर्वी संविधान सन्मान रॅली व सहायक आयुक्त, समाज कल्याण जालना यांच्या संयुक्त विद्यमाने संविधान जनजागृती रॅलीचा शुभारंभ जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बंन्सल यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. रॅलीचा प्रारंभ मंठा चौफुली येथून झाला आणि विद्यार्थ्यांनी संविधान मूल्यांच्या घोषणा देत मस्तगड येथे मार्गक्रमण केले. मस्तगड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील दुपारी १२.३० वाजता मुख्य कार्यक्रमास कार्यक्रमाच्या अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिमा मित्तल ,उदघाटक जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे, सेवानिवृत्त उपप्राचार्य बी.वाय. कुलकर्णी, समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्री. राजकुमार म्हस्के , तसेच अविनाश बहिर आदि मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशेष अधिकारी स्नेहल मोदाळे यांनी केले . तद्नंतर संविधान उद्देशपत्रिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्ष जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संविधान उद्देशपत्रिकेतील समान संधी या विषयावर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व संविधानातील मूल्यांना दैनंदिन आयुष्यात जगण्याचे आवाहन केले . तसेच शासकीय वसतिगृह निरीक्षण समितीच्या अध्यक्ष या नात्याने वसतिगृह व शासकीय निवासी शाळेतील विद्यार्थ्यांना सर्व सोयी- सुविधा देण्यासाठी व त्यांच्या अडचणी समजून त्यांचे निराकरण करण्यासाठी नेहमी तत्पर असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या उ्दघाटक मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना श्रीमती मिन्नू पी.एम यांनी संविधान दिनानिमित्त विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन संविधानातील मुलभूत तत्वावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते से.नि उपप्राचार्य बी.वाय.कुलकर्णी यांनी संविधानातील मूलभूत मूल्यांवर प्रभावी विचार व्यक्त केले. तसेच डॉ. राजकुमार म्हस्के यांनी संविधानाबाबत आपले विचार व्यक्त केले. इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी अविनाश बहिर यांनी उपस्थितास मार्गदर्शन केले. या कार्यक्रमामध्ये जिल्हाधिकारी जालना यांच्या हस्ते राजर्षी शाहु महाराज गुणवत्ता पुरस्कार प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना धनादेश व प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांच्या हस्ते शासकीय निवासी शाळा व वसतिगृहातील संविधान दिनानिमित्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेतील विजेत्यांना, सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना तसेच शासकीय निवासी शाळा बदनापूर येथील राज्यस्तर व विभागस्तर क्रिडा स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन त्यांना सत्कार करण्यात आला. मुलींची शासकीय निवासी शाळा जालना येथील विद्यार्थीनी संविधानावर आधारित पथनाट्य कार्यक्रमात सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक डॉ. दिलीप गिरी यांनी केले.

कार्यक्रमात सहायक आयुक्त,समाजकलयाण जालना कार्यालयातील व सर्व शासकीय वसतिगृह , शासकीय निवासी शाळा कार्यालयातील सर्व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. असे कळविले आहे.

## भारतीय संविधान दिनानिमित्त उद्देशिकाचे सामुहिक वाचन



आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/ भारतीय संविधान दिन हा जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत उत्साहाने साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी उपस्थितांसह भारतीय संविधानाच्या उद्देशिकाचे सामूहिक वाचन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी सुकेशिनी पगारे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

नागरिकांमध्ये घटनात्मक मूल्यांना प्रोत्साहन देणे आणि संविधानाबद्दल जनजागृती करणे हा संविधान दिन साजरा करण्यामागचा मुख्य उद्देश आहे. २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये आजच्या दिवशी भारताच्या संविधान सभेने संविधान स्वीकारले होते. हा दिवस संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अमूल्य योगदानाला समर्पित आहे. अपर जिल्हाधिकारी मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूलभूत मूल्यांप्रति आपली निष्ठा आणि वचनबद्धता यावेळी व्यक्त केली. भारताचे संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान असून, ते देशाच्या लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. या कार्यक्रमातून संविधानाने दिलेल्या हक्कांसोबतच मूलभूत कर्तव्यांची जाणीव ठेवून देशाची एकात्मता आणि अखंडता कायम राखण्याचा संकल्पही सर्वांनी यावेळी केला. याप्रसंगी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मतदार याद्यांतील त्रुटी दूर करून हरकती व दावे दाखल करण्यासाठी मुदतवाढ द्यावी - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे



आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/जालना शहर महानगरपालिका निवडणूक २०२५ करिता प्रसिद्ध झालेल्या १६ प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये मोठ्या त्रुटी आढळून आल्याने दुरुस्ती व हरकती, दावे दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी माजी आमदार कैलासजी गोरंटयाल व भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या वतीने जालना महानगराच्या वतीने जिल्हाधिकारी, जालना व आयुक्त, जालना शहर महानगरपालिका यांच्याकडे निवेदनाद्वारे आज करण्यात आली.

भास्कर आबा दानवे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जालना महानगरपालिकेतील सर्व १६ प्रभागांच्या प्रारूप मतदार याद्यांची प्रभागनिहाय व घरक्रमांकनिहाय पुनरपडताळणी करावी, प्रभागाबाहेरील व्यक्तींची नावे त्वरित सदर प्रभाग याद्यांतून वगळावीत व प्रत्यक्ष वास्तव्यास असलेल्या प्रभागात त्यांची नावे समाविष्ट करावीत. मतदार पडताळणी प्रक्रियेत बी.एल.ओ. यांनी प्रत्यक्ष स्थळभेट देऊन आधार दस्तऐवजांच्या आधारे शहानिशा करावी, आवश्यक पुरावे सादर केल्यास पात्र व्यक्तींची नावे नवीन मतदार म्हणून समाविष्ट करण्यात यावीत, मयत झालेल्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात यावीत, पुनरपडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच सुधारित मतदार यादी प्रकाशित करावी, तसेच हरकती व दावे दाखल करण्यासाठी निश्चित मुदतवाढ देण्यात यावी.

यावेळी विजय कामड, सिद्धिविनायक मुळे, देविदास देशमुख, महेश निकम, अमोल धानुरे, विजय पवार, कपिल दहेकर, मनोज इंगळे, रोहित नलावडे आदींची उपस्थिती होती.

## जालन्याचा होतकरू खेळाडू, किशोर डांगे पुन्हा आंतरराष्ट्रीय स्तरावर ती चमकला..



आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/भारतात आणि महाराष्ट्रामध्ये जालना पोलिस डिपार्टमेंट यांचा सन्मान झाला.. आंतरराष्ट्रीय स्तरावरती मेडल मिळवल्यामुळे पुन्हा जालन्याचे नाव उंची वरती पोहोचले आहे.. यावेळी जालन्याचे सन्माननीय पोलीस अधीक्षक साहेब अजय कुमार बंसल साहेब यांनी किशोर डांगे यांचा पोलीस दलातर्फे सत्कार केला.. तसेच अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपानि सर, पोलीस उप. अधीक्षक श्री कुलकर्णी साहेब, राखीव पोलीस निरीक्षक श्री वाघ सर व समस्त जालना पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल शुभेच्छा दिल्या.. आणि जालना पोलीस दलाचे नाव उंची वरती जागतिक स्तरावरती पोहोचल्या बद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले... असे खेळाडू फार कमी असतात.. त्यांना सहकार्य केले पाहिजे अशी भूमिका यावेळी सन्माननीय पोलीस अधीक्षक साहेबांनी मांडली... आणि पोलीस दल किशोर डांगे यांना सहकार्य करणार, आणि किशोर डांगे यांनी नेहमीच जालना पोलीस दलासाठी अशी पदके मिळून आणावीत असे उल्लेख केले.. किशोरच्या उत्तुंग कामगारी बद्दल जिल्हा पोलीस प्रशासनाला खूप अभिमान आहे असेही यावेळी नमूद करण्यात आले.. किशोर हा पोलीस दलाचा हिरा आहे आणि त्याला जोपासणे आपले कार्य आहे.. असेही त्यांच्या सहकार्याकडून सांगण्यात आले.. भारत देशाचे नाव उंच शिखरावरती पोहोचवणारा हा हिरा आपल्या जालना पोलीस दलात असल्याचा त्यांच्या सहकाऱ्यांनी उल्लेख केला... असा हा सहकारी सात समुद्र पलीकडून आपल्या जालना पोलीस दलासाठी आंतरराष्ट्रीय लेव्हलला मेडल मिळून आणतो.. खरंच करावं तेवढं त्याच्या अभिनंदन कमी आहे.. अशी ही भूमिका त्यांच्या सहकार्याकडून मांडण्यात आली...

जालन्यातील किशोर डांगे यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर लेन अमेरिकन वर्ल्ड पोलीस फायर गेम २०२५ सेंड लुईस पोस्टसी मेक्सिको यूएसए येथे वर्ल्ड गेम मध्ये किशोर डांगे यांनी गोल्ड मेडल मिळवले यावेळी पोलीस अधीक्षक यांनी सत्कार करून अभिनंदन केले .

# भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ

## राष्ट्रीय हितापेक्षा मोठे काहीही नाही, संविधान हेच आमचे मार्गदर्शक - मा.आ.कैलास गोरंटयाल

आत्ताच एक्सप्रेस

**जालना प्रतिनिधी**/ भारतीय संविधान दिनानिमित्त भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून संविधानाची सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमास माजी आमदार कैलासजी गोरंटयाल व भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थित होती.

या कार्यक्रमामध्ये २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात जीव गमावलेल्या निष्पाप नागरिकांना व शहीद जवानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून शहीद वीरांना आदरांजली वाहिली. यानंतर संविधान उद्देशिकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. सर्वांनी संविधानातील मूल्यांचे रक्षण करण्याची व लोकशाही बळकट करण्याची शपथ घेतली. माजी आमदार कैलास गोरंटयाल यांनी सांगितले की, संविधान हा केवळ कायद्यांचा दस्तऐवज नसून राष्ट्रनिर्मितीचा मार्गदर्शक आहे. आजच्या युवा पिढीने संविधानाचा अभ्यास करून देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देणे गरजेचे आहे. लोकशाही मजबूत करण्यासाठी सामाजिक ऐक्य, बंधुता आणि शांततेचे मूल्य जपले पाहिजे. यावेळी भास्कर आबा दानवे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतीय संविधान हे जगातील सर्वश्रेष्ठ व सर्वसमावेशक संविधान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य माणसाला न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या मूल्यांवर उभे राहण्याचा अधिकार दिला.

### संविधानाचे पालन करणे हीच खरी राष्ट्रसेवा - भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे



संविधानाचे पालन करणे हे केवळ कर्तव्य नसून ती राष्ट्रसेवा आहे. संविधानातील विचारांची जपणूक करून ती पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी भाजपा पदाधिकारी, नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, बूथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख, विविध आघाडी, सेल चे संयोजक, कार्यकर्ते व बंधू भगिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सुखापूरी मध्ये भक्तीरसाचा महासागर!; अखंड हरिनाम सप्ताह व भागवत ज्ञानयज्ञाची २८ नोव्हेंबर पासून जयघोषाने सुरुवात



आत्ताच एक्सप्रेस

**सुखापूरी (प्रतिनिधी)**/ सुखापुरी (ता. अंबड, जि. जालना) येथील श्री दत्त मंदिर, बाजार मैदान येथे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी 'श्री दत्त जयंती' निमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह, श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आणि श्री गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचे हे १३ वे वर्ष असून, भाविकांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे. सुखापुरी ग्रामस्थ मंडळ व सुखदेव गणेश मंडळ यांच्या नेतृत्वाखाली आयोजित हा सप्ताह शुक्रवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२५ रोजी सुरू होणार असून, याची सांगता शुक्रवार, दिनांक ०५ डिसेंबर २०२५ रोजी काल्याच्या कीर्तनाने होणार आहे.

**कथा प्रवक्ते आणि दैनंदिन कार्यक्रम:**

सप्ताहादरम्यान दररोज दुपारी २ ते ४ या वेळेत 'श्रीमद् संगीत भागवत कथा' होणार आहे. कथा प्रवक्ते म्हणून प.पू. गुरुवर्य एकनाथानंद सरस्वती (भोलेबाबा) यांच्या शिष्या कु. स्वातीताई (भागवत उपासक, सिद्धेश्वर पिंपळगाव) या उपस्थित राहणार आहेत. त्यांना साथ संगत करण्यासाठी अरुण राखुंडे (सिंध व गायन) आणि गणेश डोर्ले (तबला) उपस्थित असतील. सप्ताहाचा दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ वाजता काकडा भजनाने सुरू होईल. त्यानंतर विष्णूसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, गाथा भजन, हरिपाठ आणि रात्री ९ ते ११ या वेळेत नामवंत कीर्तनकारांचे हरिकीर्तन व त्यानंतर हरिजागर होईल.

**सप्ताहातील कीर्तनकारांची मांदियाळी:**

या सप्ताहात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची उपस्थिती लाभणार आहे. रात्री ८ ते १० या वेळेत खालील कीर्तनकार सेवा रुजू करतील:

२८ नोव्हेंबर (शुक्रवार): ह.भ.प. दिपक महाराज पडूळे (संभाजीनगर), २९ नोव्हेंबर (शनिवार): ह.भ.प. विष्णू महाराज मस्के (धुरुंडे, हदगाव), * ३० नोव्हेंबर (रविवार): ह.भ.प. दिगंबर महाराज नखाते (आळंदी), *१ डिसेंबर (सोमवार): ह.भ.प. केशव महाराज पवार (आळंदी), * २ डिसेंबर (मंगळवार): ह.भ.प. सुनिता गायके, * ३ डिसेंबर (बुधवार): ह.भ.प. नाना महाराज पुरुषोत्तमपुरीकर, * ४ डिसेंबर (गुरुवार): ह.भ.प. भागवताचार्य विष्णू महाराज आळंदे (मासिंगावकर),महाप्रसाद आणि काल्याचे

**कीर्तन:**

सप्ताहाची सांगता शुक्रवार, दि. ०५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. महंत मधुसूदन महाराज सरस्वती (संत ज्ञानेश्वर म. संस्थान, राजापूर फाटा) यांच्या सुश्राव्य काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. भाविकांना उपस्थितीचे आवाहन:

या अखंड हरिनाम सप्ताहात परिसरातील सुखापुरी, लखमापुरी, कुक्कडगाव, बेलगाव, जालूरा, वडीकाळ्या, करंजाळा, रेलगाव, सिरसगाव, कावंडगाव, झिरपी, ताडहादगाव, दहेगाव या गावांतील भजनी मंडळी हरिजागरासाठी उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी कीर्तन श्रवणाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त गावकऱ्यांनी व सुखदेव गणेश मंडळाने केले आहे. या कार्यक्रमासाठी ध्वनी व्यवस्था सौरभ मंडप डेकोरेशन (सुखापुरी) यांनी केली असून, मृदंगाचार्य, हार्मोनियम वादक आणि विणेकरी आपली सेवा अर्पण करणार आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अ‍ॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813